**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ७/२/२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८१७/ सांगली | श्री.संपतराव परशराम जाधव मु.पो.साळशिंगे, ता.खानापूर, जिल्हा सांगली | सचिव भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, साळशिंगे, विटा | शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सांगली | सन २००३ ते २००८ या कालावधीतील बिंदुनामावली व जमाखर्च, पदोन्नती बाबत माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २. | ७८७/ सांगली | श्री.विलास बाबुराव सगरे मु.पो.लेंगरे, ता.विटा, जिल्हा सांगली | ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, ऐतवाळी, (अगस्तीनगर) ता.खानापूर, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी वर्ग १, पंचायत समिती, खानापूर, जिल्हा सांगली | ऐतवाळी नळ पाणीपुरवठा पाईप लाईन, घरकुल योजना, दारुबंदी ठराव, ग्रामसेवकाचा कार्यकाल, इ.बाबत माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने गट विकास अधिकारी खानापूर यांच्याकडे दिलेल्या जबाबात नमूद केले, ही वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केली आहे. |
| ३ | ८०६/ सांगली | श्री.लक्ष्मीबाई दत्तात्रय पवार व्दारा आकाराम मारुती शिसाळ, गट नं.७६, मु.पो.ता.पलूस, जिल्हा सांगली | ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मु.पो.ता. पलुस, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,पलूस, जिल्हा सांगली | सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या सहीची दि.४/४/२००८ रोजी दिलेली पत्रे गावातील कोणाला देण्यात आलेली आहेत, याबाबत | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने ग्राम विकास अधिकारी, यांना दि.४/१०/०८ रोजी लेखी कळविले असल्याचे जन माहिती अधिकारींना सादर केले. |
| ४ | ७९४/ सांगली | श्री.अशोक शंकर भोसले रा.इस्लामपूर, (सरानोबत बंगला, जावडेकर हास्कूलच्या पाठीमागे), | माहिती अधिकारी, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा. | प्र.प्राचार्य, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जिल्हा सांगली | सन २००१ ते २००७ या कालावधीतील श्री.बी.डी.पाटील, हिंदी अधिव्याख्याता यांच्या पगार पत्रकांच्या साक्षांकित प्रती व श्री.बी.डी. पाटील, | अपीलकर्त्याने शुल्क भरले नव्हते. आवश्यक ती माहिती शुल्क भरुन घेण्यात येईल, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ता. वाळवा, जिल्हा सांगली | जिल्हा सांगली | | ग्रंथपाल यांच्या सन २००७-२००८ या कालावधीतील पगार पत्रकाच्या प्रती | |
| ५ | ८२७/ सांगली | श्री रियाज शहाबुद्दीन मगदुम सावंतपूर कॉलनी. मु.पो.किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली | उप अभियंता (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उपविभाग, सांगली | कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ, सांगली विभाग, जिल्हा सांगली. | मे.कृष्णा सिमेंट एम.आय.डी.सी. कुपवाड सांगली पाणी कनेक्शन क्र. २६७ च्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दयांची माहिती. | आवश्यक ती माहिती दि. २९/२/०९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ८१२/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | सह.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा | सन १९९८ ते माहे ऑगस्ट २००८ या कालावधीतील कर्मचारी अधिकारी यांच्या बदलीच्या अनुषंगाने ३ मुद्दयांची माहिती | माहिती अपिलकर्त्याने शुल्क भरले नव्हते. परंतु नंतर माहिती निःशुल्क दिली. अपिलकर्त्यास हवे असलेल्या नमुन्यांमध्ये दि. ७/३/२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु.क्र. १ ते ६ (क्र.८१७, ७८७, ८०६, ७९४, ८२७ व ८१२ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११-०२-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शांताराम दत्तात्रय वैद्य
अ/९, प्रेमानंद को-ऑप. हौसिंग सासायटी,
राजेंद्रनगर, पुणे ४११०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय उपअधीक्षक ,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५८+१२५९ / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शांताराम दत्तात्रय वैद्य
अ/९, प्रेमानंद को-ऑप. हौसिंग सासायटी,
राजेंद्रनगर, पुणे ४११०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११००१ डॉ.अरुण यशवंत देहाडराय

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय उपअधीक्षक,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ४११००१ प्रतिनिधी श्री.के.टी.सुकासे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br><br> ससून हॉस्पिटल, पुणे चे एमएलसी केसपेपर नं.७८७९ व त्याअनुषंगाने दिलेल्या एमएलसी प्रमाणपत्राची दि.६.३.२००७ प्रत- या संदर्भातील, मूळ तारीख कोणती, या प्रमाणपत्राच्या आधीच्या व नंतरच्या पाच प्रमाणपत्राच्या प्रती, प्रायव्हेट हॉस्पिटलकडून गेल्या वर्षभरात अशा किती केसेस आल्या व त्यातील पेशंटचे केसपेपर व त्यांना दिलेल्या इंज्यूरी प्रमाणपत्राच्या प्रती, प्रमाणपत्रावर सहा दिवसात हा उल्लेख आहे. हे अनुमान खाजगी डॉक्टरांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे दिले हे खरे आहे काय, नसल्यास कोणत्या वैद्यकिय पुस्तकाचा आधार घेऊन हा अभिप्राय दिला आहे, दि.२७.२.२००७ रोजी विश्रामबाग पोलिसांनी कोणते कागदपत्र दिले, पेशंट वांबुरे यांच्या केसपेपरची छायांकित प्रत व त्या संबंधातील सर्व माहिती, एमएलसी प्रमाणपत्रासंबंधीची नियमावली व इतर सर्व माहिती. |
|---|---|

## विवेचन

श्री.शेखर उध्दवराव वांबुरे या व्यक्तीच्या संदर्भातील ससून सर्वोपचार रुग्णालयातील वैद्यकीय उपचाराबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. शांताराम दत्तात्रय वैद्य यांनी मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कलम ८(१)(छ-जी)(ज-एच) व (क-जे) नुसार माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय उपअधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी कळविले व तोच निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी कायम केला. त्याविरुध्द श्री.वैद्य यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२७.६.२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर होते. श्री.वैद्य यांना आधी माहिती नाकारली असली तरी दि.५.३.२००८ रोजी सविस्तर माहिती देण्यात आली त्याबाबत काही शंका व्यक्त करणारे पत्र त्यांनी दि.२४.३.२००८ रोजी दिले. त्यावेळी त्याचे निरसन करणारे उत्तर दि.२८.४.२००८ रोजी देण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा डॉ.नितीन बिलोलीकर व अपिलीय प्राधिकारी डॉ.आनंद मलिक यांनी त्यावेळच्या प्रपत्रात नमूद केले होते. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नाही. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कळवून माहिती नाकारण्यात आली. वस्तुतः हे प्रकरण न्यायप्रविष्ट नव्हते, असे श्री.वैद्य यांनी आयोगाकडील

अपिलात नमूद केले आहे. दि.२८.४.२००८ रोजी ऊर्वरित माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी म्हटले असले तरी आयोगाकडे अपील केल्यानंतर व आयोगाने विचारणा केल्यानंतर ही माहिती देण्यात आली आहे, असेही श्री.वैद्य यांनी नमूद केले.

ससून सर्वोपचार रुग्णालयाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे आपल्याविरुध्द गुन्हा दाखल झाला. आपण एका बँकेत व्यवस्थापक असून त्या गुन्ह्यामुळे आपल्याला मनःस्ताप झाला व आपली अप्रतिष्ठा झाली, असे प्रतिपादन श्री.वैद्य यांनी विस्ताराने केले.

संबंधित प्रकरणी पोलिसांकडून तपास चालू असल्यामुळे आपण ते न्यायप्रविष्ट असल्याचे कळविले. 'शस्त्रक्रिया विभागात रुग्ण आला नाही,' असे प्रमाणपत्रावर नमूद केले असताना फ्रॅक्चर किती जुने आहे याचे प्रमाणपत्र देऊन खोटे रेकॉर्ड तयार केले, हा श्री.वैद्य यांचा आक्षेप योग्य नाही. रुग्ण तपासल्याशिवाय व एक्स-रे पाहिल्याशिवाय प्रमाणपत्र दिले जात नाही. रुग्ण शस्त्रक्रिया विभागात गेला नसल्यास वैद्यकीय अधिकारी त्याबाबत काही करु शकत नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे डॉ.अरुण देहाडराय यांनी सांगितले. पोलीस ठाण्याकडून यादी आल्यानंतर एमएलसी दिले जाते. श्री.वांबुरे यांना तपासून त्या आधारे प्रमाणपत्र तयार करुन दिले, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे श्री.सुकासे यांनी सांगितले.

ससूनबाहेरच्या डॉक्टरांनी दिलेल्या प्रमाणपत्रावरुन, रुग्णाला न तपासता प्रमाणपत्र दिले जाते का, अशी विचारणा श्री.वैद्य यांनी केली होती. मात्र बाहेरच्या डॉक्टरांचे प्रमाणपत्र स्वीकारतानाच रुग्ण तपासल्याशिवाय असे प्रमाणपत्र दिले जात नाही, असे श्री.के.टी.सुकासे व डॉ.देहाडराय यांनी नमूद केले.

एमएलसीच्या संदर्भात संबंधित रुग्ण पोलीस यादीसह आल्यास तपासणी करुन उपचार केले जातात व तपासणी करुन प्रमाणपत्र दिले जाते. विनायादी आल्यास तेथेच असलेल्या ओपीडी पोलिसांना माहिती दिली जाते, असेही डॉ.देहाडराय यांनी सांगितले.

विषय न्यायप्रविष्ट नाही, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मधील माहिती नाकारण्याबाबतची कोणतीही तरतूद या विषयाला लागू होत नाही, हे लक्षात घेता माहिती नाकारण्याचा तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ.बिलोलीकर यांचा निर्णय योग्य नव्हता.

मात्र 'तपास चालू असल्यामुळे न्यायप्रविष्ट असल्याचे उत्तर अन्वयार्थ लावण्यात झालेल्या चुकीने दिले गेले,' हे श्री.के.टी.सुकासे व डॉ.देहाडराय यांनी दिलेले स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. श्री.वैद्य यांनी विचारलेल्या १९ मुद्दयांची माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र 'एमएलसी केस ससून हॉस्पिटलमध्ये आल्यानंतर काय काय केले पाहिजे? उदा.पोलिसांना कळविणे, वगैरेबाबतची नियमावलीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी' ही मुद्दा क्र.१९ मध्ये मागितलेली माहित (नियमावली) व संबंधित एमएलसी केसच्या संदर्भातील कागदपत्रे श्री.वैद्य यांना दिली जाणे आवश्यक आहे. अशी स्वतंत्र नियमावली नसलयास त्याबाबतची कार्यपध्दती स्पष्ट व नेमक्या स्वरुपात अपीलकर्त्यास दिली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) एमएलसी रुग्णाच्या संदर्भातील नियमावलीची प्रत, तसेच बाहेरच्या डॉक्टरांनी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे केल्या जाणाऱ्या कार्यवाहीबाबतची स्पष्ट पध्दती नमूद करणारे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तीन दिवसात द्यावे, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी श्री.के.टी.सुकासे यांनी दि.५.२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२.२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९१८/ सोलापूर | श्री. महादेव गणपत गायकवाड मु.पो.अकलूज, रणजितनगर, ता.माळशिरस, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, माढा, ता. माढा, जि.सोलापूर | तहसीलदार, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | मौजे चांदज व मौजे आलेगाव (खुर्द), ता. माढा येथील समस्त रखवालदार कामगार महार व कामगार महार यांच्या रेकॉर्डच्या नकला. | अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती देण्यात आली, ऊर्वरित माहिती देण्याबाबत उभयतात एकमत झाले. |
| २ | ९४७/ सोलापूर | श्री. शिवलिंग कृष्णा निलाखे मु. पो. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, कळंब, जि. उस्मानाबाद | तहसीलदार, कळंब, जि.उस्मानाबाद | मौजे नागझरवाडी, ता. कळंब येथील स. न. ३०७ व ३५४ चे हिश्श्याचे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार, गट नं. ८४५, ८४६, ८४७,८४८ चे १९९०/९१ पर्यंतचे ७/१२ व फेरफार उतारे इत्यादी . | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद करून दि.२६.०२.०९ च्या पत्राने आयोगास कळविले आहे. |
| ३ | ९५०/ सोलापूर | श्री. राजाराम साधु गवळी मु. पो. पेनूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, जि. सोलापूर | तहसीलदार, मोहोळ, जि. सोलापूर | मौजे पेनूर येथील जमीन गट नं. ५४८/१/१/१अ व ६७ चे मूळ ७/१२ उतारे, क्र.जमा/२/ तक्रार नोंद एस आर १४७ मोहोळ दि १४.३. ०६ ची झेरॉक्स. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याचे निवेदन प्रपत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी सादर केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १२४२/ सोलापूर | श्री. सुभाष शंकर बावकर मु. पो. नातेपुते, ता.माळशिरस, जि. सोलापूर | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस, जि. सोलापूर | अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर | मौजे नातेपुते येथील गट नं. २०९ ची मोजणी कशाचे आधारे केली, हद्दी खुणा प्रत्यक्ष जागेवर येऊन का दाखविल्या नाहीत, पूर्वीच्या गट नकाशाप्रमाणे व वहिवाटी प्रमाणे मोजणी करता येते का, इत्यादी. | योग्य मोजणी करून मिळावी, ही अपीलकर्त्यांची मागणी माहिती चा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | १२५५/ सोलापूर | श्री .महेश किसनराव भोसले मु. पो. खानोटा, ता. दौड, जि. पुणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर, जि.सोलापूर | अपिलीय प्राधिकारी भूमी अभिलेख, पंढरपूर, जि. सोलापूर | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांचे कार्यालयाकडून क्र. एल एक्यू /आंबे / ९८ ग. न. ८८/ पंढरपूर दि. २७.०५.९८ या पत्रान्वये विशेष भूसंपादन अधिकारी नं ३ सोलापूर, यांना झालेली गट दुरूस्ती कळविण्यात आली,ही दुरूस्ती कोणत्या कारणामुळे करण्यात आली, गट नं ८८ मध्ये केलेल्या फेरबदलाची माहिती. | गट नं . ८८ चे दुरूस्ती बाबतची माहिती पुरविण्याबाबत उभयतात एकमत झाले. |
| ६ | १३००/ सोलापूर | श्री. सिध्दलिंग रामलिंग स्वामी ६ कमलपुष्प को. ऑप. हौ. सोसायटी, पूना रोड, भाटिया गॅरेज मागे, कळवा, ठाणे | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस, जि सोलापूर | अधीक्षक, भूमी अभिलेख सोलापूर | मौजे वेळापूर येथील स.न. ३८५,हिस्सा नं १+३+४+५ दि. ०१.०१.७५ चे जाब जबाब, कब्जे पावती, गट बांधणी नकाशा, फाळणी नकाशा, इत्यादी | अपिलकर्त्यास आवश्यक माहिती आठ दिवसांत देण्याबाबत उभयतात एकमत झाले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १३०७/ सोलापूर | श्री. दिगंबर मोतीराम भूमकर ३०४, उत्तर कसबा, सोलापूर | अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर | अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर | अपिलकर्ता कार्यालयात कार्यरत असलेल्या कालावधीची संकलनाची माहिती, लिपिक कामकाज कार्यपध्दती माहिती व इतर एकूण १५ मुद्यांची माहिती | माहिती अवलोकन करून नि:शुल्क देण्याबाबत एकमत झाले |
| ८ | १२६१/ सोलापूर | सौ. जोगेश्वरी धनाजी काटे मु.पो.तांदुळवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस , जि.सोलापूर | अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर | मौजे तांदुळवाडी येथील गट नं ८९८ चे मोजणीसाठी दि. २१.१२.०६ रोजी दिलेल्या अर्जाची व सहपत्राची प्रत, सदर गटाची मोजणी झाली असल्यास नकाशा, गट नं ८९८ /१/१पश्चिमेकडून गटाची मोजणी झाली काय, असल्यास नकाशा व इतर एकूण ६ मुद्यांची माहिती. | अपिलकर्त्याची मोजणीची मागणी प्रशासकीय कार्यवाहीत येत असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही याबाबत उभयतामध्ये एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अ.क्र. १ ते ८ (क्र ९१८, ९४७, ९५०, १२४२, १२५५, १३००, १३०७ व १२६ १) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १२५५ व १३०० या अपीलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे. त्यानुसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास सबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.२७-०२-२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.म्हातारबा नारायण टाव्हरे
मु.टाव्हरेवाडी, पो.अवसरी बु.ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३१ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.म्हातारबा नारायण टाव्हरे
मु.टाव्हरेवाडी, पो.अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.ग.भा.हिंगे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे
श्री.पांडुरंग रामभाऊ हिंगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.३.२००७ |
| ८ | <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br>शिक्षण प्रसारक मंडळी (विद्या विकास मंदिर) अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे या संस्थेशी संबंधित माहिती. कालावधी २७.४२९८५ ते ३१ डिसेंबर २००६. संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत विश्वस्त संख्या व त्यांची यादी, तारखेसह, तसेच विश्वस्त व सभासदांची देणगी रक्कम स्वीकारल्याबद्दल सविस्तर खुलासा व्हावा. संस्थेची दि.२७.४.१९८५ रोजी संस्थेच्या घटनेप्रमाणे निवडणूक प्रक्रिया प्रत्येक पंचवार्षिकचा दि.३१ डिसेंबर २००६ अहवाल व त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याची नेमणूकीचा तपशील तारखेसह मिळावा. संस्थेच्या घटना स्थापनेपासून विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळ याच्या मासिक सभा तसेच शिक्षण मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा, संस्थेचा जमाखर्च, प्रत्येक वर्षाचा ताळेबंद अहवाल. मा.धर्मादाय आयुक्त, पुणे यांजकडे पाठविलेल्या पत्रव्यवहाराची आवक जावकसह माहिती, ३१ डिसेंबर २००६ अखेर मिळावी. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.म्हातारबा नारायण टाव्हरे(गुरुजी) यांनी शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु. ता.आंबेगाव, जि.पुणे या संस्थेशी संबंधित माहिती संस्थेच्या विद्या विकास मंदिराचे प्राचार्य यांच्याकडे मागितली होती. संस्थेची माहिती आपल्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी श्री.टाव्हरे यांना विहित मुदतीत कळविले. त्याविरुध्द त्यांनी कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे याच्याकडे केलेले अपील जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.टाव्हरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाने दि.२७.६.२००८ रोजी घेतलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहितीबाबत तीनही घटकांत एकमत न झाल्याने अपिलाची सुनावणी घेण्यात आली. याच विषयाबाबत श्री.टाव्हरे यांनी धर्मादाय आयुक्तांकडे अपील केले असल्याचे त्यावेळी प्रपत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर सचिव, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु., ता.आंबेगाव श्री.ग.भा.हिंगे यांनी श्री.टाव्हरे यांना माहितीसाठी रु.१५००/- शुल्क भरण्याबाबत दि.२५.७.२००८ रोजी कळविले. परंतु विहित मुदतीत आपल्याला कोणतीही माहिती देण्यात आली नसल्यामुळे ती निःशुल्क मिळावी व जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी उपलब्ध आलेली माहिती संगनमताने दडवून ठेवली असल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी, अशी मागणी श्री.टाव्हरे यांनी आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री.टाव्हरे हे संस्थेचे सभासद असून संस्थेच्या कारभाराबाबत त्यांना माहिती आहे. मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याकडे संस्थेची माहिती नसते, तरीही संस्थेकडे माहिती न मागता शाळेच्या प्राचार्यांकडे त्यांनी माहिती मागणे अयोग्य आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.पांडुरंग हिंगे व अपिलीय प्राधिकारी श्री.ग.भा.हिंगे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तसेच याच विषयाबाबत दि.६.७.२००७ या एकाच दिवशी, श्री.टाव्हरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे व धर्मादाय आयुक्तांकडेही अपील केले आहे, असेही त्यांनी निदर्शनास आणले.

संस्थेची माहिती शाळेच्या मुख्याध्यापकांच्या अखत्यारीत नसल्यामुळे श्री.टाव्हरे यांच्या अर्जाबाबत दि.२०.१.२००७ व ३०.१.२००७ रोजी आपण संस्थेला कळविले होते, असे प्राचार्य श्री.पांडुरंग हिंगे यांनी सांगितले. शुल्क भरण्याबाबत आपल्याला वर्षाच्या कालावधीनंतर कळविण्यात आले. शुल्क कोठे भरावयाचे हे कळविले नाही, असे प्रतिपादन श्री.टाव्हरे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता संस्थांतर्गत वादातून माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात असल्याचे दिसते. दि.२७.४.१९८५ ते ३१.१२.२००६ या काळातील माहिती मागितली असून त्यात खुलाशाचीही मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले असले तरी संस्थेने माहिती दिलेली नाही. मात्र ती देऊ केल्याचे कार्याध्यक्ष श्री.ग.भा.हिंगे यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात

म्हटले आहे. आपण श्री.टाव्हरे यांच्याकडे दोन वेळा समक्ष जाऊन त्यांच्या माहितीच्या मागणीविषयी चर्चा केली, तसेच संस्थेमध्ये येऊन माहिती घेऊन जाण्यास सांगितले, परंतु ते माहिती नेण्यास आले नाहीत, असे श्री.ग.भा.हिंगे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ते लक्षात घेता शास्ती व अन्य कारवाईची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे. मात्र संस्थेने माहिती नि:शुल्क देणे आवश्यक आहे. विहित कार्यपध्दती सोडून एकाच विषयात वेगवेगळ्या ठिकाणी अपिले करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावरील शास्ती व अन्य कारवाईची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

(३) अपीलकर्त्याने मागितलेली व खुलासा, भाष्य हा तपशील वगळता 'माहिती' च्या व्याख्येत बसणारी माहिती दि.२०.२.२००९ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी व त्याबाबतचा अहवाल त्यानंतर एका आठवड्यात आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.११.२.२००९

जानेवारी-२००९-८१-८४

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९४४/ सोलापूर | श्री.मकबुल जाफर शेख मु. पो.उमरड, ता. करमाळा, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, वामनराव बदे विद्यालय, उमरड, ता. करमाळा, जि. सोलापूर | सचिव, ग्रामविकास शिक्षण संस्था, उमरड, ता.करमाळा, जि. सोलापूर | कर्मचारी सेवा ज्येष्ठता यादी, श्री. पोपट दशरथ माने व मकबूल जाफर शेख यांच्या नेमणूक पत्राची प्रत, श्री. माने व शेख यांच्या मान्यता प्रती, श्री. पोपट माने यांच्या पदोन्नती साठी पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत, व इतर एकूण १० मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ७६३/ सोलापूर | श्री. सुशिलकुमार सुरेश अमनूर ७५६, दक्षिण कसबा, मळगे सदन, सोलापूर | मुख्याध्यापिका, स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळा, प्लॉट नं १० /११, लक्ष्मीनारायण थिएटर समोर, एम. आय. डी. सी. रोड, सोलापूर | सेक्रेटरी, नॅशनल असोशिएशन फॉर द ब्लाईंड, रत्नदिप हौ. सोसायटी जवळ, विकास नगर मागे, सिव्हिल लाईन, सोलापूर | श्री राजू बापू मिरेकर यांचा शिक्षक नियुक्ती आदेश, वैयक्तिक मान्यता प्रत, जून २००४ ते मे २००५ शिक्षक हजेरी पत्रक, इयत्ता १० वी व डी.एड. गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जून २००४ ते मे २००५ पगार पत्रक झेरॉक्स प्रत इत्यादी. | अन्य व्यक्तींची मागणी त्रयस्थ पक्ष मान्यते शिवाय मान्य करता येणार नाही, हा अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८६८/ सोलापूर | श्री.संतोष पांडुरंग साळुंखे मु. पो.हत्तीज, ता. बार्शी, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, नागनाथ प्रशाला जामगाव (पां), ता. बार्शी, जि. सोलापूर | अध्यक्ष, शिवशक्ती बहुउद्देशीय सेवा संस्था, जामगाव(पां), ता. बार्शी, जि. सोलापूर | जून १९९७ ते जून २००७ पर्यंत नेमलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवा पुस्तक प्रत, नेमणूक आदेश, दि. १२.१०.०७ चा शिक्षणाधिकारी यांचा आदेश इत्यादी. | अपिलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती आठ दिवसांत देण्याबाबत उभयंतात एकमत झाले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:-

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील अपिले अ. क्र. १ ते ३ (९४४, ७६३ व ८६८) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. ७६३ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास शिक्षक हजेरी पत्रकाची व पगारपत्रकाची प्रत द्यावी व पूर्तता अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात आयोगाला सादर करावा.

३) अपील क्र ८६८ मध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयंतामध्ये एकमत झाले आहे. त्यानुसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवडयात पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व योग्य त्या कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.२७.०२.२००९ .**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गोरखनाथ नामदेव वेताळ
१०६१, स्टेट बँक कॉलनी, शिरुर,
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोरखनाथ नामदेव वेताळ
१०६१, स्टेट बँक कॉलनी, शिरुर, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.सिध्दार्थ चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती (कालावधी २००४-०५ ते २००६-०७)**<br><br>इयत्ता ५ वी ते ८ वी साठी एकूण विषय किती, प्रत्येक विषयाचे गुण, परीक्षेचे एकूण गुण, सवलतीचे गुण किती देता येतात, एका वेळी जास्तीत जास्त किती विषयांना,त्याचे निकष, इयत्ता ५वी ते ८वी साठी विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे(वरच्या वर्गात जाण्यास पात्र असण्याचे) निकष कोणकोणते आहेत. सदर निकष कोणाकडून ठरविले जातात, छायांकित प्रत, याप्रमाणेच इयत्ता नववी ते दहावीसाठी माहिती. | |

## विवेचन

इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे (वरच्या वर्गात जाण्यास पात्र असण्याचे) निकष व त्या अनुषंगाने विषय व गुण याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.गोरखनाथ नामदेव वेताळ यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे मागितली होती. त्यांच्याकडून उत्तर न आल्यामुळे श्री.वेताळ यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. या कार्यक्रमाला अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता १५ वर्षे शिक्षक म्हून काम करीत आहेत आणि तरीही परीक्षेसाठी असलेले एकूण विषयवार गुण, सवलतीच्या गुणांबाबतचे निकष, उत्तीर्ण होण्याचे निकष इ. माहिती मागत आहेत. मग शिक्षक म्हणून १५ वर्षात ते कशाच्या आधारे काम करीत आहेत, असा प्रश्न अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब यांनी

सुनावणीत उपस्थित केला. आपण शिक्षक म्हणून ही माहिती मागितली असून एक नागरिक म्हणून ही माहिती मागितली आहे. तसेच शाळेतून माहिती नेमक्या स्वरुपात मिळत नाही. वेगवेगळ्या शाळांमध्ये सवलतीचे गुण व वरच्या वर्गात जाण्याची पात्रता याबाबत भिन्न निकष आढळल्यामुळे खात्री करुन घेण्यासाठी आपण ही माहिती मागितली आहे. सर्व शाळांमध्ये निकषांबाबत समानता असावी, अशी त्यामागील आपली भूमिका आहे, असे श्री.वेताळ यांनी स्पष्ट केले.

श्री.वेताळ यांचा अर्ज प्राप्त झाला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.सिध्दार्थ चव्हाण यांनी सांगितले. श्री.वेताळ यांनी अर्जाची पोहोच असल्याचे दाखवले. त्याबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयातील आवक शाखेचा शिक्का व श्री.वेताळ यांनी पोहोच म्हणून दर्शविलेला शिक्का यात तफावत असल्याचे श्री.प्रकाश परब व श्री.सिध्दार्थ चव्हाण यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. या शिक्क्यात 'शिक्षणाधिकारी' हा शब्द खोडून 'शिक्षण विभाग' असे लिहिलेले आहे, असे दिसून आले.

श्री.वेताळ यांना वेगवेगळ्या शाळांमधील निकषात तफावत आढळलेली असल्यास त्यांनी प्रशासकीय मार्गाने शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. त्याची दखल घेतली जाईल, असे श्री.परब यांनी सांगितले. श्री.वेताळ यांनी मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबंधित नसून शिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील ह विषय आहे. 'जीवन शिक्षण' व 'जीवन संक्रमण' या अंकांमध्ये त्यांना हवी असलेली माहिती प्रसिध्द झालेली आहे, असेही त्यांनी नमूद केले. आपल्या अर्जाची दखल घेतली गेली नाही, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी शिक्षणाधिकारी कार्यालयात झालेली नाही, त्यामुळे शास्ती व शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.वेताळ यांनी केली. कलम ४ च्या अंमलबजावणीचा विषय त्यांच्या मूळ अर्जात नाही, मात्र तरीही ही बाब महत्त्वाची आहे.

श्री.वेताळ यांनी केलेला अर्ज योग्य जन माहिती अधिकाऱ्यांना मिळाला की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. या स्थितीत शास्ती व अन्य कारवाईची मागणी मान्य करता येणार नाही. मात्र त्यांनी उपस्थित केलेला सवलतीचे गुण व उत्तीर्ण होण्याची पात्रता यातील निकषाच्या समानतेबाबतचा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्या अनुषंगाने त्यांना माहिती दिली गेली पाहिजे.

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याने मागितलेली माहिती (जीवन शिक्षण व जीवन संक्रमण या अंकातील संबंधित मजकुराच्या प्रतींसह) निःशुल्क द्यावी. याबाबतचा अहवाल २५.२.२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१३.२.२००९

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. अपील/ पुणे/२४८५ /२००८
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्र. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि. :-१८-२-२००९

प्रति,

जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी,
एम.आय.डी.सी., जोग सेंटर, २रा मजला,
वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे-६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५
अंतर्गत श्री. संपत धोंडिबा देवकर यांचा दि. - चा अर्ज

महोदय,

२/- सोबत श्री. संपत धोंडिबा देवकर, रा. इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे-३९ जि.पुणे यांचे अपील पाठविण्यात येत आहे. त्या अर्जातील विषय असा आहे की, सन १९९७-९८ मध्ये शासकीय सूचनेप्रमाणे रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात देण्यात आलेल्या औद्योगिक भूखंडाबाबत त्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती त्वरित देण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२०.२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहे.

आपला

(स्वाक्षरी)
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ

प्रत :

श्री. संपत धोंडिबा देवकर, रा. संकल्प हौ.सोसायटी, ब्लॉक नं.५,सेक्टर नं.१, इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे-३९

२/- आपले मागणी प्रमाणे त्वरित माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. प्लॉट मिळण्याची आपली मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. यास्तव आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहे.

३९

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. अपील/पुणे/[illegible]/ 2509/08
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्र. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि. २६ -२ -२००९

प्रति,

विलास बाबुराव खरे
जय शिवाजी निवास रु.नं. 3
विनोदेवस्ती मारुंजी - ठाकरे चौक रोड हिंजवडी
ता: मुळशी

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय

आपण दि.20 /10 /२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही, याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला

(स्वाक्षरी)

( रा.म. गेंगजे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. अपील/पुणे/ [illegible] २७६४/०९
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्र. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि. : २६-२ -२००९

प्रति,

दिपक भानुदास गडकर
रा. निमोणे ता. शिरूर जि. पुणे

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय

आपण दि. --/--/२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही, याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला

(रा.म. गेंगजे)
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ

क्र. अपील/पुणे/ २७८४
राज्य मााहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१
फोन क्र. : २६०५०५८०/२६०५०६३२/३३
दि. :१२-२ -२००९

प्रति,

चंदुलाल पोकार
१ ग्रीन हार्वेस्ट सोसायटी मगरपट्टा सिटी
मेन गेट समोर मगरपट्टा रोड हडपसर पुणे -२८

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय

आपण दि. ८/१ /२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही, याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला

(स्वाक्षरी)

( रा.म. गेंगजे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,
पुणे खंडपीठ